'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
ISSN :2348-7143 (Online)
मराठी भाषा आणि साहित्य विशेषांक
Vol. 3 Issue. 3
July-Sept.- 2016

# संशोधन पध्दती –भाषा व तळटीपा

प्रा. डॉ. भारती शंकर नवथर
इतिहास विभाग प्रमुख
कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय राहुरी
भ्र. ९४२३७८४६२२

*इतिहासलेखनात सर्वसामान्य प्रमेये किंवा नियम मांडण्यासाठी इतिहासकाराला सूक्ष्म आकलन शक्ती, तीक्ष्ण बुध्दिमत्ता व या बरोबर तर्कशुध्द विचारशक्ती व कल्पनाशक्तीची गरज असते. अनेक घटितांतील सादृश्य शोधण्यासाठी आकलनशक्ती लागते, तर सर्वसामान्य तत्व मांडण्यासाठी तर्कसंगत विचार करण्याची बौध्दिक क्षमता, कल्पनाशक्ती लागते. अशा प्रकारचे इतिहासलेखन उच्च दर्जाचे मानले जाते, कारण त्यातून मानवी जीवनाबाबतच्या चिरकालीन सत्याचा आविष्कार होत असतो आणि म्हणून अशा इतिहासलेखनाला अक्षय स्वरूप प्राप्त होते.*

भूतकालीन घटनांचा शोध घेवून इतिहासकार भूतकाळाची नव्याने मांडणी करत असतो. ज्याच्या आधारे तो घटकांची मांडणी करतो ती इतिहासाची साधने खूपच महत्वाची असतात. साधनांचा शोध, संकलन, परीक्षण व मांडणी ही इतिहास संशोधनाची प्रक्रिया महत्वाची आहे.

**ग्रंथ निर्मितीचे स्वरूप :–**

घटितांची जुळणी व घटितांचा अन्वयार्थ नि: संदिग्धपणे संशोधनाच्या मनात तयार झाल्यानंतर प्रत्यक्ष लेखनाची संशोधित विषयाला शब्दरूप देण्याची व ग्रंथ निर्मितीची प्रक्रिया सुरू होते. हा संशोधनपर लिखाणाचा अखेरचा टप्पा असतो. आणि हया टप्यात संशोधकाची शास्त्रीय भूमिका संपून तो सृजनशीलतेच्या, कलेच्या प्रांतात प्रवेश करतो.

संशोधित विषयाला ग्रंथरूप देण्यासाठी त्याचे प्रकरणात विभागीकरण करावे लागते.प्रत्येक प्रकरणात अभ्यास विषयाचे घटक विषयाचा एक घटक व उपघटक समाविष्ट असतात. हे सर्व एकाच विषयाचे घटक असल्यामुळे त्यांच्यात सुसंगतीचे सूत्र असावे लागते. प्रत्येक प्रकरण स्वतंत्र असले तरी ते मागील व पुढील प्रकरणाशी संबध्द असावे लागते. सर्व प्रकरणे अशी परस्परांशी जुळलेली असली तरच ग्रंथाला एकजिनसीपणा, एकसूत्रता येते.

ग्रंथ लेखनाच्या वेळी लेखकाला काही पथ्ये पाळावयाची असतात. लेखातील विधाने स्पष्ट, तर्कसंगत व नि:संदिग्ध असावी. तसेच ती परस्परांशी जुळणारी असावी लागतात. ग्रंथात परस्पराविरूध्द विधाने आल्यास ग्रंथाची विश्वासार्हता व परिणामकारकता कमी होते. तसेच विषयाचा तपशील देताना अप्रस्तुत व अनावश्यक तपशील कटाक्षाने टाळावा लागतो. तपशील घालताना प्रत्येक वेळी त्याची गरज आहे का? ग्रंथांच्या तर्कसंगत मांडणीत तो आवश्यक आहे का? त्यामुळे मांडणीच्या प्रवाहात बाधा तर येत नाही? याचा विचार ग्रंथलेखकाने करणे निकडीचे असते. केवळ व्यासंग दर्शविण्यासाठी तपशील देण्याचा अट्टाहास केल्यामुळे मुख्य मुद्यावरून लक्ष विचलित होते, मुख्य मुद्यावर वाचकांचे लक्ष खिळविणे ग्रंथाच्या परिणामकारकतेसाठी आवश्यक असते. ग्रंथाच्या प्रास्ताविकांत ग्रंथ लेखनाची उद्दिष्टे, विषयाचे महत्व, वापरलेली स्त्रोत साधने आणि साधन संकलनाची माहिती देणे प्रस्तुत ठरते, तर अखेरच्या प्रकरणात संशोधनाचे सार स्पष्ट करणे अगत्याचे असते.

**भाषा कशी असावी :—**

भाषा हे भावनांच्या, विचारांच्या अभिव्यक्तीचे प्रभावी माध्यम आहे. संशोधकाने तयार केलेल्या घटितांच्या आराखडयाला ग्रंथरूप देण्याचे काम भाषेचे असते. गतकालीन अमूर्त घटनांत प्राण ओतून त्यांना सजीव करण्याचे काम भाषा करते. निर्जीव घटितांना इतिहासकार भाषेच्या माध्यमाचा वापर करून बोलते करतो. यामुळे ग्रंथ प्रभावी व परिणामकारक होणे ब—याच अशी भाषेवर अवलंबून असते. इतिहासात कथनाचा, वर्णनाचा भाग बराच असल्यामुळे इतिहासलेखकाला कल्पकता व कलात्मकता यांचा उपयोग येथे करता येतो.

ग्रंथ लेखन परिणामकारक होण्यासाठी भाषा ही विषयाला समर्पक अशी असावी लागते. शब्दातून नेमका अर्थ होण्यासाठी शब्दांची निवड, त्यातील अर्थछटा लक्षात घेऊन करावी लागते. शब्दात व वाक्यात अर्थघनता असावी, थोडया मोजक्या शब्दात विषय मांडण्याचे कौशल्य महत्वाचे ठरते. वाक्यरचना सरळ सोपी, व भाषा एकूण ओघवती व अर्थवाही असणे श्रेयस्कर ठरते. वाक्यरचना बोजड, लांबलचक, व गुंतागुंतीची असल्यास विषयाचे सहजपणे आकलन होत नाही.बोजड शब्द व आलंकारिक भाषेला इतिहासलेखनात स्थान नाही. तसेच भाषा रंजक असावी. भाषा नीरस व रटाळ असल्यास मौलिक संशोधनपर ग्रंथ देखील ग्रंथालयातील कपाटातच धुळ खात पडून राहतात. तसेच लेखनातील विषयाच्या स्वरूपाप्रमाणे भाषेत बदल झाल्यास ती परिणामकारक ठरते.उदाहरणार्थ, कारणमीमांसेसाठी अगर युक्तिवादासाठी व मुल्यमापनासाठी भाषा प्रौढ,तर व्यक्तिमत्वाचे व घटनांचे वर्णन करताना शब्दचित्र उभे करणारी, कलात्मक असावी.

इतिहासलेखनात भाषाशैलीला किती महत्व द्यायचे याबाबत इतिहासलेखकांत भिन्न मते आढळतात. काही संशोधक मौलिक विचार असल्यास भाषेमुळे लिखाणाच्या प्रभावीपणात फरक पडत नाही असे म्हणून भाषेला गौण स्थान देतात, तर ॲलन नेव्हिन्स सारखे इतिहासकार,''लिखाणातील मुद्यांच्या शास्त्रीय स्वरूपाच्या अभावाबद्दल एक वेळ क्षमा करता येईल परंतु लालित्याच्या अभावाबद्दल मात्र क्षमा नाही'' असे म्हणताना दिसतात. इतिहासलेखन म्हणजे छायाचित्र काढणे नसून ती रंगीत कलाकृती आहे व तिच्यात रंग भरण्याचे काम भाषेचे असते, असे मत काही इतिहासलेखक मांडतात. थोडक्यात म्हणजे संशोधित मौलिक माहिती प्रभावी रीत्या मांडणारी, मनाची व बुध्दीची पकड घेणारी भाषा असावी लागते. या दृष्टीने सर जदुनाथ सरकार यांच्या ग्रंथात मौलिक संशोधनाधिष्ठित विषय आणि प्रभावी पण रंजक भाषा यांचा समसमा संयोग झालेला आढळतो. भाषा ही लेखकाच्या व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब असते. लेखकाचे व्यक्तिमत्व जेवढे प्रगल्भ तेवढीच भाषाही प्रभावी व परिणामकारक ठरते. 'लेखकाने सोपी, स्पष्ट व परिणामकारक भाषा कशी लिहावी ते कोणतेही शास्त्रीय अथवा तंत्रज्ञान सांगू श्शकणार नाही.' हे **जी.के. क्लार्क**
यांचे विधान इतिहासाच्या संशोधकांना मार्गदर्शन करणारे आहे. कारण भाषा कमवावयाची असते. कमावलेल्या भाषेतून लेखकाचे व्यक्तिमत्व दिसते आणि अशी भाषा विषय मांडणीचे प्रभावी माध्यम ठरते. म्हणूनच कोणत्याही उच्च दर्जाच्या लेखकाच्या भाषेची नक्कल करण्याचा प्रयत्न हास्यास्पद ठरतो.

**तळटीपा कां व कशा द्याव्यात?**

**तळटीपा** :— संशोधकाला अनेक उद्देश समोर ठेऊन तळटीपा दाखवाव्या लागतात. आपला मुख्य मजकुर संपल्यानंतर पृष्ठाच्या तळाला जी टीप दिली जाते. त्याला तळटीप असे म्हणतात.

तळटीपा हा संशोधनपर इतिहास लेखनाचा अनिवार्य घटक आहे. संशोधक संशोधनासाठी अध्ययन करतांना अनेक दुय्यम साधनांतून मूळ कागदपत्रातून संशोधक माहिती संकलित करतो. त्यातील काही माहितीतून

नवा मुद्दा मिळतो, तोवर अज्ञात असलेली माहिती मिळते, तर काही साधनांतून संशोधकाच्या मतांना पुष्टी देणारे संदर्भ सापडतात. संशोधनात्मक इतिहास लेखन करताना हया माहितीचा वापर इतिहासलेखक करतो. तसे करताना वापरत असलेली ऐतिहासिक माहिती काठून मिळविली याचा उल्लेख लेखनात अत्यावश्यक असतो. ऐतिहासिक पुराव्यांचे संदर्भ स्पष्ट पणे निर्दिष्ट केल्याखेरीज संशोधनात्मक लिखाणाला विश्वासार्हता प्राप्त होत नाही, हे काम तळटीपा करतात.

**तळटिपा देण्याचे मुख्यत: चार उद्देश असतात.**

१. ज्या स्त्रोत साधनांतून माहिती मिळाली असेल, त्यांचा ऋणनिर्देश करणे
२. लेखात केलेल्या विधानांना पुष्टी देणे,
३. लेखात उपस्थित होणारे मुद्दे अगर त्यात उल्लेखिलेल्या व्यक्ती अगर प्रसंगाबाबत अधिक माहिती देणे.
४. लेखात पुर्वी येऊन गेलेल्या संदर्भाचा पुन्हा निर्देश करणे आवश्यक असल्यास पुर्वीच्या संदर्भाचा उल्लेख करणे.

संशोधकाने आपल्या लिखाणात जी नवी माहिती दिली असेल ती विश्वासार्ह आहे हे पटविण्यासाठी ऋणनिर्देश करणे, ज्या स्त्रोतसाधनातून माहिती घेतली असेल त्याचा उल्लेख करणे आगत्याचे ठरते. त्याखेरीज ग्रंथाला सत्याचा भक्कम आधार मिळत नाही. तसेच संशोधकाने युक्तिवाद करताना आपल्या मतांना पुष्टी देणारी इतरांची काही मते उद्धृत केली तर त्याच्या विधानांना पृष्टी मिळते, त्यांना वजन प्राप्त होते. अनेकदा संशोधन करताना काही घटना अगर व्यक्तीविषयी बरीच नवी माहिती मिळते. ती सर्वच विषयाला प्रस्तुत असते असे नाही. परंतु तो तपशील दिल्यास त्या विषयावर नवा प्रकाश टाकता येतो. मात्र असा तपशील मुळ लेखाच्या प्रवाहात चपखलपणे बसत नाही. तो लेखात दिल्यास लेखाचा ओघ खंडित होतो. अशी अतिरिक्त परंतु महत्वाची माहिती तळटीपांत देता येते. मात्र अशी माहिती लांबलचक नसावी. माहिती बरीच अधिक असल्यास, ती नवी व मूळ स्वरूपाची असल्यास ती परिशिष्टाच्या रूपात द्यावी. अशी नवी व महत्वाची माहिती थोडक्यात देण्याजोगी असल्यास ती तळटीपेत देणे श्रेयस्कर ठरते. कधी लेखनाच्या ओघात पुर्वी निदिष्ट केलेला एखादा संदर्भ पुन्हा देणे आवश्यक ठरते. अशा वेळीही तळटीपेचा वापर करता येतो.

तळटीपा केव्हा व कशाप्रकारे द्याव्यात याचे तंत्र आहे. नवी माहिती देणा—या विधानांना तसेच महत्वाच्या विधानांना तळटीपा देणे आवश्यक असते. सर्वसामान्य: ज्ञात असलेल्या माहितीसाठी तळटीपेची गरज नसते. उदाहरणाथ, शिवाजीचा जन्म शिवनेरी येथे झाला. हे विधान सर्वसामान्य आहे, त्यामुळे त्याला तळटीपेची आवश्यकता नाही. परंतू शिवजन्माच्या तारखेचा उल्लेख असेल तर तो वादग्रस्त मुद्दा असेल तर त्या सर्वासाठी एकच तळटीप पुरते. केवळ व्यासंग प्रदर्शित करण्यासाठी भरमसाट तळटीपा देऊ नयेत. लेखकाची स्वत:ची विधाने व इतरांची मतदर्शक विधाने यातील भेद स्पष्ट करण्यासाठी तळटीपा आवश्यक ठरतात.

तळटीपा देण्याच्या वेगवेगळया पध्दती प्रचलित आहेत. पहिली पध्दत म्हणजे ज्या पृष्ठावरील विधानाला तळटीप द्यावयाची ती त्याच पानावर खालच्या भागात देणे! वाचकांच्या दृष्टीने ही पध्दत सोयीची ठरते. पृष्ठातील आवश्यक त्या ठिकाणी क्रमश: १,२,३ असे आकडे देऊन,त्याच आकडयानुसार पृष्ठाच्या खालच्या भागात टीप द्यावयाची असते.२)कधी हे क्रमांक पृष्ठानुसार बदलतात. म्हणजे एका पृष्ठावर जेवढे आकडे आले असतील, त्या पुढील आकडे नंतरच्या पृष्ठावर प्रकरणाच्या अखेरीपर्यंत दिले जातात. तसेच टिपांची माहिती मुद्रणाच्या सोयीसाठी प्रत्येक पृष्ठाच्या खाली न देता प्रकरणाच्या अखेरी सलगपणे देता येते. हे मुद्रणाच्या

ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2016

दृष्टीने सोयीचे ठरते व मुद्रित सुबक दिसते. ३)कधी तळटीपांचे क्रमांक ठरल्याप्रमाणे दिले जातात. परंतु टिपांचा मजकूर मात्र ग्रंथाच्या अखेरी प्रकरणानुसार दिला जातो. ही पध्दत प्रदीर्घ वापरलेली आढळते.

तळटीपा देण्याची विशिष्ट पध्दत आहे. त्याचा क्रम निर्धारित केलेला आहे. तळटीपेत संदर्भ देताना प्रथम लेखकाचे, संपादकाचे,आद्याक्षरांसह आडनाव, नंतर स्वल्पविराम देऊन ग्रंथाचे शीर्षक, खण्ड क्रमांक, नंतर प्रकाशक व प्रकाशन वर्ष व शेवटी पृष्ठ क्रमांक असा क्रम ठरलेला आहे. लेखनात एखाद्या ग्रंथाचा प्रथम उल्लेख येतो तेव्हा ग्रंथाचे शीर्षक पुर्ण द्यावे, नंतर ग्रंथमाचा संक्षेप् दिला तरी चालतो.

तळटीपा देणे सुकर व्हावे, यासाठी इंग्रजीत काही शब्द वापरले जातात उदाहरणार्थ, Ibid, Opcit ,Loc cit, P.

Ibid हा शब्द एकाखाली एक असा ग्रंथाचा संदर्भ दिला असल्यास Ibid हा शब्द वापरतात. मराठीत त्यासाठी कित्ता हा शब्द वापरण्याचा प्रघात आहे. पृष्ठ क्रमांक वेगळा असल्यास तो निर्दिष्ट करतात. Opcit या मुळ लॅटिन शशब्दाचा अर्थ ' त्याच ग्रंथात ' असा आहे.म्हणून एखाद्या संदर्भ ग्रंथाचा उल्लेख पुर्वी येऊन गेला असेल आणि त्याचा पुन्हा निर्देश करावयाचा असेल, व त्या दोहोंच्या मधे दोन तीन तळटीपा आलेल्या असतील तर Opcit वापरतात. Opcit चा वापर करताना फक्त लेखकाचे नाव व पृष्ठ क्रमांक देण्याची गरज असते. ग्रंथ शीर्षक नाही. मात्र संदर्भ ग्रंथाचा पुर्वीचा उल्लेख एक दोन पृष्ठापूर्वी आलेला असल्यास ग्रंथशीर्षक देणे अधिक श्रेयस्कर असते.

Loc cit हा देखील लॅटिन शब्दाचा संक्षेप आहे. त्याच अर्थ ''त्याच जागी'' असा आहे. म्हणजे ग्रंथ तोच व पृष्ठ क्रमांकही तोच म्हणून Loc cit चा पुर्वी येऊन गेलेल्या संदर्भग्रंथाच्या व पृष्ठ क्रमांकाच्या व निर्देशासाठी केला जातो. Loc cit लिहितांना केवळ ग्रंथलेखकाचे नाव द्यावयाचे असते. Opcit व Loc cit मध्ये ग्रंथनाम तेच असते. मात्र Opcit मध्ये ग्रंथलेखकाचे नाव व पृष्ठ क्रमांक द्यावा लागतो. Loc cit मध्ये फक्त ग्रंथलेखकाचे नाव द्यावयाचे असते. Opcit व Loc cit साठी अनुक्रमे उपरोक्त व तत्रैव हे शब्द साधारणपणे वापरतात.

RESEARCH JOURNEY

नियतकालिक, हस्तलिखित मूळ कागदपत्राचा तळटीपेत उल्लेख करताना नियतकालिकाचे शीर्षक अंक क्रमांक, वर्ष व पृष्ठ क्रमांक द्यावा लागतो. मुळ कागदपत्र असल्यास ते कोणत्या ठिकाणी मिळाले त्या स्थळाचे नाव, फाईल क्रमांक, कागद क्रमांक देणे आवश्यक असते.

**वर निर्दिष्ट केलेले तळटीपांचे तंत्र स्पष्ट करण्यासाठी नमुन्यादाखल नोंदी –**

१. य.दि.फडके, लोकमान्य टिळक आणि क्रांतीकारक, १९८५ पृ.१०
२. गो.पा.बापट, एक अज्ञात क्रांतीकारक १९६७ पृ.४६६
३. अप्पा पटवर्धन, माझी जीवनयात्रा १९७१ पृ.५०
४. कित्ता, पृ.५५
५. वि.म.भट, अभिनव भारत १९५० पृ. १००
६. गो.पा.बापट, उपरोक्त . पृ.४५०
७. विजय देशमुख, शककर्ते शिवराय पूर्वार्ध १९८० पृ. ११०
८. य.दि.फडके, तत्रैव
९. चित्राव शास्त्री, मध्ययुगीन चरित्र कोश १९३७ पृ. ६०
१०. न.चि. केळकर, मराठे व इंग्रज १९२२ पृ. ७०

अशा प्रकारे तळटीपा देतात.

**तळटीपा** :– संशोधकाला अनेक उद्देश समोर ठेऊन तळटीपा दाखवाव्या लागतात. आपला मुख्य मजकुर संपल्यानंतर पृष्ठाच्या तळाला जी टीप दिली जाते. त्याला तळटीप असे म्हणतात.

**तळटीपांचे दुरूपयोग** :– तळटीपा या उपयुक्त असल्यातरी त्याचा अतिरेक नसावा कारण सामान्य वाचकाला त्यांचा फारसा उपयोग होत नाही.तरीही योग्य ठिकाणी तळटीपा दिल्यास त्या उपयुक्त ठरतात.

**अवतरणांचा वापर**:– आपल्या लिखानात संशोधक विविध प्रकारच्या अवतरणांचा वापर करतो. अशी अवतरणे विविध कारणाणे दिली जातात उदा.

१. आपल्या मताचे विस्तृत विश्लेषन करण्यासाठी
२. आपल्या मुद्दयाचा आशय स्पष्ट करण्यासाठी
३. एखादयाचे मत खोडून काढण्यासाठी
४. एखादया विशिष्ठ मुद्दयाचे समर्थन करण्यासाठी
५. एखादा करार किंवा कोष्टक दयायचे असल्यास

अवतरणे वापरण्याचेही अनेक नियम आहेत. अवतरणे ही लांबसडक नसावीत अवतरणात वापरली जाणारी वाक्य वास्तवतेला धरून आसावीत. विपर्यास करणारी नसावी. अवतरण चिन्हाचा वापर करूनच अवतरणे दयावीत. मुळ अवतरणातील चूक लेखकाने दुरूस्त करू नये. अथवा त्यात बदल करू नये. ज्या ठिकाणी वाक्य तोडले जाते त्या ठिकाणी (......) अशी खुण करावी.

इतिहासलेखनात सर्वसामान्य प्रमेये किंवा नियम मांडण्यासाठी इतिहासकाराला सूक्ष्म आकलन शक्ती, तीक्ष्ण बुध्दिमत्ता व या बरोबर तर्कशुध्द विचारशक्ती व कल्पनाशक्तीची गरज असते. अनेक घटितांतील सादृश्य शोधण्यासाठी आकलनशक्ती लागते, तर सर्वसामान्य तत्व मांडण्यासाठी तर्कसंगत विचार करण्याची बौध्दिक क्षमता, कल्पनाशक्ती लागते. अशा प्रकारचे इतिहासलेखन उच्च दर्जाचे मानले जाते, कारण त्यातून मानवी जीवनाबाबतच्या चिरकालीन सत्याचा आविष्कार होत असतो आणि म्हणून अशा इतिहासलेखनाला अक्षय स्वरूप प्राप्त होते.

**संदर्भग्रंथ सूची** :–

१. Carr E.H. - What is History
२. Chitnis K.N. - Researeh methdology an History
३. Shekh Ali. - History Its theory and method
४. Toynbee A.J. - A Study of History
५. गायकवाड,सरदेसाई हनुमाने – इतिहास लेखनशास्त्र
६. घाटे वि.द. – इतिहास शास्त्र आणि कला
७. राजदेरकर सुहास – इतिहास लेखनशास्त्र
८. आठवले सदाशिव – इतिहासाचे तत्वज्ञान